# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen property**

**Police Station** :- **Washim Rural**

**Date of Good Work done** :- **26/09/2020**

**Brief of the work done :-**

दहा लाखांचे सोयाबीन पळविणारा चोरटा जेरबंद व मुद्देमाल हस्तगत, ग्रामीण पोलिसांची कामगिरी

## दहा लाखांचे सोयाबीन पळविणारा चोरटा जेरबंद

### ग्रामीण पोलिसांची कामगिरी : मुद्देमाल हस्तगत



वाशीम, दि. २५ (प्रतिनिधी)

येथील व्यापाऱ्याचे २६६ क्विंटल सोयाबीन नियोजीत स्थळी न पोहचविता सोयाबीन घेऊन पोबारा करणाऱ्या आरोपीस ग्रामीण पोलिसांनी जेरबंद केले असून विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले आहेत. अहमद नगर जिल्ह्यातून ९ लाख ८८ हजार २९८ रुपयांचे सोयाबीन देखील हस्तगत करण्यात आले आहे. अंबादास राधाकिसन सानप रा. ठाकुर पिंपळगाव ता. शेवगाव जि. अहमदनगर असे अटकेतील चोरट्याचे नाव आहे.

पोलीस सुत्रांकडून प्राप्त माहितीनुसार, आनंद ओमप्रकाश चरखा यांनी १२ सप्टेंबर रोजी या संदर्भात ग्रामीण पोलिसांत फिर्याद दिली होती. चरखा यांची बालाजी कृषी बाजार नावाची शेतमाल खरेदी व अडत दुकान आहे. त्यांना शालीमार सोयासबीन फॅक्टरी काटोल, नागपूर येथे २६६ क्विंटल सोयाबीन पाठवायची होती. यासाठी त्यांनी एम. एच. १६ सीसी. ४९९९ क्रमांकाचा ट्रक भाड्याने केला. या ट्रकचा चालक भाऊसाहेब याच्यासोबत भाडे ठरवून ट्रकमध्ये सोयाबीन भरुन सदर ट्रक रवाना केला. परंतु सदर ट्रक नियोजीत वेळेत नागपूर येथे पोहचलाच नाही. त्यामुळे त्यांनी ट्रक चालक, मालक तसेच मध्यस्थी व्यक्तीसोबत भ्रमणध्वनीवर संपर्क केला असता संपर्क होवू शकला नाही. सदर शेतमाल परस्पर विकून आपली फसवणूक होत असल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी पोलिसांत फिर्याद दिली.

जिल्हा पोलीस अधीक्षक वसंत परदेशी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. पवन बनसोड यांच्या मार्गदर्शनात ग्रामीण पोलिसांनी तपासचक्र फिरवित आरोपीचा सुगावा लाऊन त्याला गजाआड केले. सदर आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून चोरुन नेलेले अहमद नगर जिल्ह्यातून ९ लाख ८८ हजार २९८ रुपयांचे सोयाबीन देखील हस्तगत केले. सदर कारवाई ठाणेदार संजय शिंपणे, सपोनी महेश मळले, एएसआय. रमेश जावभाये, पोहेकॉ केशव सरकटे, पोना. प्रशांत अभोरे, निलेश तायडे, राजेश गोंगवे, अजय शिंदे यांनी केली.